व्यंकटेश महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. साक्षी कोरवीचे एम. कॉम. परीक्षेमध्ये यश

श्री व्यंकटेश महाविद्यालयातील एम. कॉम. भाग दोन मध्ये शिकत असलेल्या कु. साक्षी कोरवी या विद्यार्थिनीने मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत तृतीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने तिचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले. अभ्यासातील सातत्य व कष्ट हे यशाचे गमक असल्याचे या विद्यार्थिनीने सिद्ध केले. तिने मिळवलेल्या यशाबद्दल तिचे मनापासून कौतुक व अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा असे उद्गार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी केले. गेली अनेक वर्षे व्यंकटेश महाविद्यालयाने नेहमी शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीमध्ये क्रमांक पटकावला आहे आणि ही परंपरा कु. साक्षी कोरवी हिने कायम केली आहे असेही ते म्हणाले. विद्यार्थिनीचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी महाविद्यालयाचे संस्था पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक वर्ग उपस्थित होते त्याचबरोबर त्यांचे मोलाचे मार्गदर्शनदेखील यश संपादन करण्यामध्ये लाभले.

